महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
अमरावती विभागीय मंडळ अमरावती,
MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION
AMRAVATI DIVISIONAL BOARD, AMRAVATI 444602

पत्र क्र. अविमं/माप/ ९६३
अमरावती,दि.-२५/०७/२०२४

प्रति,
मा.उपसंचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
अमरावती विभाग,अमरावती.

**विषयः-माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र(इ. १२ वी) जुलै-ऑगस्ट २०२४ पुरवणी परीक्षेच्या वेळापत्रकातील बदलाबाबत..**

**संदर्भः-** पत्र क्र. रा. मं./ परीक्षा-६/ २९१६,दि. २५/०७/२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की,माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र(इ. १२ वी) जुलै-ऑगस्ट २०२४ पुरवणी परीक्षेच्या वेळापत्रकातील बदलाबाबतच्या प्रकटनाची प्रत सोबत जोडली आहे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेत येणा-या वृत्तपत्रातून विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी व मंडळास सहकार्य करावे, हि विनंती.

सहपत्र - प्रकटनाची एकूण प्रत – ०१.

**(निलीमा टाके)**
विभागीय सचिव ,
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती

**प्रतिलिपीः-**1) मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व मान्यता प्राप्त शाळा/क.म.वि. अमरावती विभाग अमरावती यांना कळविण्यात येते की, सोबतच्या प्रकटनानुसार कार्यवाही करावी व सर्व संबंधित शिक्षक, विद्यार्थी, पालक व इतर घटकांना अवगत करावे.

2) शिक्षणाधिकारी (माध्य.) अकोला, अमरावती, बुलडाणा, यवतमाळ व वाशिम

3) मा. शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) जुलै–ऑगस्ट २०२४ पुरवणी परीक्षेच्या वेळापत्रकातील बदलाबाबत

## ॥ प्र क ट न ॥

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत जुलै–ऑगस्ट २०२४ मध्ये घेण्यात येणारी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) पुरवणी परीक्षा दि. १६/०७/२०२४ ते दि. ३०/०७/२०२४ आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पुरवणी परीक्षा दि. १६/०७/२०२४ ते दि. ०८/०८/२०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर परीक्षेचे वेळापत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले असून शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात आलेले आहे तथापि दि. २६/०७/२०२४ रोजी राज्याच्या काही जिल्हयांमध्ये अतिवृष्टीचा इशारा देण्यात आलेला आहे.

त्यामुळे दि. २६/०७/२०२४ रोजी होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेच्या वेळापत्रकामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) पुरवणी परीक्षा

| वेळापत्रकामध्ये निश्चित केलेला तपशील | वेळापत्रकाबाबत सुधारित तपशील |
|---|---|
| वार, दिनांक, सत्र, वेळ व विषय | वार, दिनांक, सत्र, वेळ व विषय |
| शुक्रवार दि. २६ जुलै, २०२४<br>सकाळ सत्र– ११.०० ते १.००<br>विषय– विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग२- (72-2) | बुधवार दि. ३१ जुलै, २०२४<br>सकाळ सत्र– ११.०० ते १.००<br>विषय– विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग२- (72-2) |

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पुरवणी परीक्षा

| वेळापत्रकामध्ये निश्चित केलेला तपशील | वेळापत्रकाबाबत सुधारित तपशील |
|---|---|
| वार, दिनांक, सत्र, वेळ व विषय | वार, दिनांक, सत्र, वेळ व विषय |
| शुक्रवार दि. २६ जुलै, २०२४<br>सकाळ सत्र– ११.०० ते २.००<br>विषय– वाणिज्य संघटन व व्यवस्थापन (51)<br>विषय– अन्नशास्त्र व तंत्रज्ञान (62)<br>विषय– एम.सी.व्ही.सी. पेपर–२–EB to XB=20 विषय | शुक्रवार दि. ०९ ऑगस्ट, २०२४<br>सकाळ सत्र– ११.०० ते २.००<br>विषय– वाणिज्य संघटन व व्यवस्थापन (51)<br>विषय– अन्नशास्त्र व तंत्रज्ञान (62)<br>विषय– एम.सी.व्ही.सी. पेपर–२–EB to XB=20 विषय |

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पुरवणी परीक्षा जुलै–ऑगस्ट २०२४ लेखी व अन्य परीक्षेच्या उर्वरित वेळापत्रकामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तरी वेळापत्रकातील उपरोक्त बदलाची सर्व संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, विद्यार्थी, पालक व अन्य घटक यांनी नोंद घ्यावी.

दिनांक–२५/०७/२०२४

(मेधा निरफराके)
सहसचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.